# शेतकऱ्यांसाठी खुशखबर! मोदी सरकारकडून २४,000 कोटींचा निधी

**नवी दिल्ली–** शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून मोदी सरकारकडून अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (१७ सप्टेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले. कृषी जिल्ह्यांच्या व्यापक विकासाच्या योजनेला मंजुरी देण्यात आली, तर अक्षय ऊर्जेमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला. मंत्रिमंडळाने २०२५-२६ पासून सुरू होणाऱ्या सहा वर्षांसाठी प्रधानमंत्री धन-धन कृषी योजना लाही मान्यता दिली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयांची माहिती देताना सांगितले की, या योजनेअंतर्गत १०० जिल्हे ओळखले जातील. कमी उत्पादन, कमी पीक रोटेशन (एकाच जमिनीवर कमी वेळा पीक घेणे) आणि कमी शेतकरी कर्ज उपलब्धता या तीन मुख्य निकषांवर आधारित हे १०० जिल्हे निवडले जातील.

गुंतवणूकदारांसाठी मोठी संधी; येस बँक, बायोकॉनसह हे स्टॉक्स देतील जबरदस्त परतावा–

सरकारने दिलेल्या माहितीनुसार, ही योजना ११ विभागांच्या ३६ विद्यमान योजना, इतर राज्य योजना आणि खाजगी क्षेत्रासह स्थानिक भागीदारीद्वारे राबविली जाईल. या योजनेअंतर्गत १०० जिल्ह्यांसाठी जिल्हास्तरीय कृषी योजना विकसित केल्या जातील. या जिल्ह्यांतील शेतकरी पीक विविधता वाढवण्यासाठी, पाण्याचे संवर्धन करण्यासाठी आणि मातीचे आरोग्य राखण्यासाठी विशिष्ट पावले उचलतील. या योजनेचे उद्दिष्ट केवळ कृषी क्षेत्र सुधारणे नाही तर देशभरात आत्मनिर्भरता (आत्मनिर्भर भारत) ला प्रोत्साहन देणे आहे. या १०० जिल्ह्यांचे निर्देशक सुधारत असताना, देशातील निर्देशक देखील सुधारतील. शिवाय, मंत्रिमंडळाने घोषणा केली की राष्ट्रीय औष्णिक वीज महामंडळ लिमिटेड (एनटीपीसी लिमिटेड) अक्षय ऊर्जा क्षेत्रात २०,००० कोटींची गुंतवणूक करेल. यामुळे भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील विकासाला चालना मिळेल आणि पर्यावरण जागरूकता वाढेल. प्रधानमंत्री धन धन कृषी योजना (पीएमडीएवाय) ही शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. ज्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात केली होती. या योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट देशभरातील १०० जिल्ह्यांमध्ये शेती मजबूत करणे आहे जिथे कृषी उत्पादकता कमी आहे, जिथे शेतकऱ्यांना कर्ज मिळविण्यात अडचणी येतात आणि पीक उत्पादन राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. ही योजना साठवणूक, सिंचन आणि आधुनिक शेती पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेली आहे. प्रधानमंत्री धन धन कृषी योजना शेतकऱ्यांना प्रत्येक स्तरावर सक्षम बनवते. या योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना कमी किंवा मोफत किमतीत सुधारित बियाणे आणि खते मिळतील, ज्यामुळे पीक उत्पादनात वाढ होईल. ट्रॅक्टर, पंप आणि इतर कृषी उपकरणांवर अनुदान देखील दिले जाईल आणि सूक्ष्म सिंचन प्रणाली सिंचन सुधारतील. पीक विविधीकरणाला प्रोत्साहन दिले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. गोदाम बांधणीमुळे साठवणूक सुलभ होईल आणि कर्जाची सहज उपलब्धता आर्थिक भार कमी करेल. शिवाय, महिला आणि तरुण शेतकऱ्यांनाही प्राधान्य दिले जाईल. प्रधानमंत्री धन-धन कृषी योजना एका विशेष पद्धतीने राबवली जाईल. शेतकरी त्यांच्या जवळच्या कृषी कार्यालयात किंवा ऑनलाइन पोर्टलवर त्यांचे आधार कार्ड, बँक खाते आणि जमिनीच्या कागदपत्रांसह नोंदणी करू शकतील. ही योजना केंद्र आणि राज्य सरकार संयुक्तपणे राबवतील. ऑक्टोबर २०२५ पर्यंत सर्व निवडक जिल्ह्यांमध्ये ती कार्यान्वित करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

# महावितरणच्या विजेच्या तारांना झाडाच्या फांद्यांचा वेढा

## सार्वजनिक ठिकाणी अपघाताची शक्यता

**टाकळीभान (वार्ताहर)–** येथील बसस्थानक परिसरातील अनेक व्यवसायिकांना वीज पुरवठा करणाऱ्या वीजेच्या तारांना झाडाच्या फांद्यांनी वेढा मारल्याने वादळात तारा तुटून सार्वजनिक ठिकाणी मोठा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे महावितरणने अपघातापूर्वीच तातडीने या फांद्या तोडून होणारा अपघात टाळावा, अशी मागणी केली जात आहे.

येथील नेवासा रोडजवळच्या ग्रामपंचायतीच्या मालकीच्या शिवपार्वती शॉपिंग सेंटरला महावितरणकडून वीज पुरवठा केला जातो. या ठिकाणी सुमारे ३५ ते ४० गाळेधारक आहेत. त्यामुळे हा परिसर नेहमीच



वर्दळीने गजबजलेला असतो. याच ओळीतील हॉटेल सावता नाष्टा सेंटरजवळ मोठे झाड आहे. महावितरणच्या वीज वाहक तारे याच झाडाखाली गेलेल्या आहेत. या तारांना झाडाच्या फांद्यांनी पूर्णपणे वेढा मारलेला आहे. मोठमोठ्या फांद्या तारेवर टेकल्याने फांद्यांच्या वजनाने तारे वाकून गेल्या आहेत.

वारा सुटल्यास झाडाच्या फांद्या हलल्याने ताराही हलू लागतात. मोठे वादळ झाले तर फांद्या तारेवर पडून तारा तुटण्याचा धोका निर्माण होतो. नेहमीच माणसांची वर्दळ असलेल्या या परिसरात अशा प्रकारे दुर्घटना झाली तर मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे महावितरणने अपघातापूर्वीच जागे होऊन वीज वाहक तारेला वेढा मारलेल्या फांद्या तोडून संभाव्य दुर्घटना टाळावी, अशी मागणी या परिसरातील गाळेधारक व नागरिक करत आहेत.

# बेलपिंपळगाव येथे विशेष ग्रामसभेला महिला-पुरुषांचा मोठा सहभाग



**पाचेगाव फाटा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथे सकाळी ९ वाजता ग्रामसभेला सरपंच किशोर गारुळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. ग्रामसभेत अनेक सकारात्मक विषयावर चर्चा करून संपन्न झाली. ग्रामस्थांना मोठ्या स्क्रीनवर मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्री यांचे मार्गदर्शन लाईव्ह दाखविण्यात आले.

१७ सप्टेंबर ते १३ ऑक्टोबर सेवा पंधरवाडा त्याचप्रमाणे शेत रस्ते, शिव रस्ते, पाणंद रस्ते, गाडी रस्ते याविषयी शासनाच्या निर्याणाचे स्वागत करून गावातील १ ते ५७ रस्त्याची नोंदणी करून सदरील रस्त्याचे व लगतचे गट नंबर यांचे वाचन करण्यात आले. यावेळी सरकारचा अभिनंदनाचा ठराव संमत करण्यात आला. ग्रामीण भागातील वरील प्रमाणे रस्त्याची मोजणी, दुरुस्ती, सांकेतिक, नंबर असे शासनाने लोकाभिमुख निर्णय घेतल्याने खऱ्या अर्थाने गावाच्या विकासासाठी बळ मिळणार आहे. रस्त्याच्या बाबतीत गावात गंभीर समस्या निर्माण झाली होती. तहसिल, पोलीस स्टेशन, भूमीअभिलेख महत्वाचे केंद्रस्थाने याप्रकरणी उडवा-उडवीची उत्तरे देत होती, परिणामी ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, दूध व्यावसायिक, शाळेत जाणारी मुले, शेतातील शेतमाल ने आण करण्यासाठी कसरत करावी लागत असे. परंतू शासनाच्या निर्णयानुसार भविष्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त निर्णय झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्याच प्रमाणे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना मध्ये सहभाग नोंदविण्यासाठीचा ठराव संमत झाला. ग्रामविकास अधिकारी दादासाहेब डवले यांनी सदरील योजने विषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी गटविकास अधिकारी संजय लखवाल, विस्ताराधिकारी श्री. कासार यांनी भेट दिली. माजी सरपंच राजेंद्र साठे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सरपंच किशोर गारुळे यांच्यासह सर्व सदस्य, कामगार तलाठी सचिन बळी आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# नेवासाः अतिवृष्टीचे पंचनामे २७ सप्टेंबरपर्यंत पूर्ण करणार

**नेवासा (तालुका प्रतिनिधी)–** नेवासा तालुक्यातील १२७ गावांमध्ये अतिवृष्टिमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे २७ सप्टेंबर पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नेवासा तहसीलदार डॉ. संजय बिरादार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल व तालुका कषि अधिकारी धनंजय हिरवे, संयुक्त पथक आदेश काढला असून नेवासा तालुक्यातील गावांमध्ये दि.१३ ते १४ सप्टेंबर मध्ये अतिवृष्टी पाऊसामुळे झालेल्या शेतपिकांचे नुकसानीचे पंचनामे करण्याकरिता संबंधीत गावातील सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांची संयुक्त पंचनामे करणेकामी नियुक्ती केली आहे.

सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसुल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या सजेतील गावामध्ये जाऊन पाहणी करून ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेती पिकाचे व फळ पिकाचे पंचनामे मुदतीत पूर्ण करून याबाबतचा अंतिम अहवाल तात्काळ विहीत नमुन्यात तालुका कृषी अधिकारी नेवासा कार्यालयास सादर करावा. उक्त कामामध्ये हलगर्जीपणा केल्यास त्यांचे विरुदध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) मधील तरतुदीनुसार तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये कारवाई करणेत येईल यांची नोंद घ्यावी अशी सक्त ताकीदही देण्यात आली आहे.

# ओबीसी महामंडळांना अशासकीय सदस्यांची प्रतीक्षा

**मुंबई (प्रतिनिधी)–** ओबीसी समाजाच्या कल्याणकारी योजनांना निधी मिळत नसल्याची तक्रार असताना राज्य सरकारने ओबीसींसाठी स्थापन केलेल्या २१ पैकी २० महामंडळांवर अजून अशासकीय सदस्य नेमलेले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने त्यांच्या वाट्याला आलेल्या महामंडळांवर नेमणुकीचा धडका लावला असताना ओबीसी महामंडळांवरील नेमणुका रखडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

महायुती सरकारने गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विविध समाज घटकांना खूश करण्यासाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या मुख्य कंपनीच्या अंतर्गत उपकंपनी म्हणून १५ महामंडळे स्थापन झाली. याशिवाय भटक्या जाती आणि विमुक्त जमातीच्या अंतर्गत सहा महामंडळे गठीत करण्यात आली आहेत.

इतर मागासवर्ग आणि बहुजन कल्याण विकास खात्याचे मंत्री हे या सर्व महामंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष तर राज्यमंत्री उपाध्यक्ष आहेत. या महामंडळांवर प्रत्येकी तीन ते सहा अशासकीय सदस्य नेमण्याची तरतूद आहे. परंतु, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाच्या व्यतिरिक्त अन्य महामंडळांना अशासकीय सदस्यांच्या नेमणुकीची प्रतीक्षा आहे.

महायुती सरकारमध्ये अद्याप शासकीय महामंडळांचे वाटप निश्चित झालेले नाही. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या पक्षाच्या वाट्याला आलेल्या महामंडळांच्या संदर्भात निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. पवार यांच्या अखत्यारीतील वित्त आणि नियोजन खात्याने अलीकडेच परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षांना कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देऊन सोयीसुविधा देण्याचा निर्णय घेतला. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे अध्यक्षपदी वर्णी लावून त्यांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा दिला आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी महामंडळांवरील अशासकीय सदस्यांच्या नेमणुकीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

**सिंधी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्याची मागणी**

दरम्यान, आर्थिकदृष्ट्या सधन मानल्या जाणाऱ्या राज्यातील सिंधी समाजाने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली आहे. शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सिंधी महामंडळ स्थापन करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहे.

**ओबीसींसाठी गठीत महामंडळे**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ

जगदज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ

संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ

संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ

संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ

श्री संत शिरोमणी नामदेव महाराज समस्त शिंपी समाज आर्थिक विकास महामंडळ

सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ

स्व.विष्णूपंत रामचंद्र दादरे (लोणारी) आर्थिक विकास महामंडळ

संत श्री संताजी महाराज आर्थिक विकास महामंडळ

संत श्री. रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ

संत भोजलिंग काका सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ

लेवा पाटीदार समाज आर्थिक विकास महामंडळ

आगरी समाज आर्थिक विकास महामंडळ

सरदार वल्लभभाई पटेल गुजर समाज आर्थिक विकास महामंडळ

राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ

कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ

ब्रम्हलीन आचार्य दिव्यानंद गुरुजी आर्थिक विकास महामंडळ

श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ

विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ

श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ

## पान १ वरुन

### हैदराबाद गॅझेट विरूध्दची...

मांडावीच लागणार आहे, असं यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर देखील पुन्हा एकदा जोरदार हल्लाबोल केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी भुजबळांचा उल्लेख अलिबाबा असा केला आहे. येवल्याचा अलिबाबा दोन आरक्षण खात आहे, त्यांना लवकरच बेसन -भाकरी खावी लागेल असा खोचक टोला यावेळी जरांगे पाटील यांनी भुजबळ यांना लगावला आहे.

**भुजबळांची प्रतिक्रिया**

दरम्यान हैदराबाद गॅझेटची याचिका फेटाळून लावल्यानंतर भुजबळ यांची देखील प्रतिक्रिया समोर आली आहे. आम्ही सांगितलं होतं जनहित याचिका नको, रिट याचिका करा, आतापर्यंत आम्ही ४-५ रीट याचिका केल्या आहेत. असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे. तसेच लेकरंबाळ आमची देखील आहेत, असं म्हणत त्यांनी यावेळी मनोज जरांगे पाटील यांना टोला लगावला आहे.

### ई-केवायसी करा अन्यथा...

सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात या परिपत्रकाच्या दिनांकापासून २ महिन्यांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सदर कालावधीत ज्या लाभार्थ्यांनी -adhar -uthentication केले नाही ते पुढील कार्यवाहीस पात्र राहतील.तसेच या योजनेंतर्गत दरवर्षी जून महिन्यापासून २ महिन्यांच्या कालावधीत या योजनेतील लाभार्थ्यांनी ई-केवायसी करणे बंधनकारक राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### १५ ऑक्टोबर की १ नोव्हेंबर?

(साखर आयुक्तालय व मिटकॉन संस्थांचा एकत्रित अंदाज) दहा टक्के ऊस हा ऊसबेणे, चारा, गूळ-खांडसरी, रसवंतीसाठी जाऊन प्रत्यक्षात ९०४ ते १२३५ लाख मे. टन उसाची उपलब्धता अपेक्षित होती. त्यातून सुमारे ९२ ते १०४ लाख मे. टन साखरेचे उत्पादन इथेनॉलकडे जाणाऱ्या साखरेव्यतिरिक्त होण्याचाही अंदाज मंत्री समितीच्या बैठकीत वर्तविण्यात आला होता. राज्यात १२.५० ते १३ लाख हेक्टरवर उसाचे पीक उभे आहे. एकूण प्रत्यक्ष उसाची उपलब्धता १२०० ते १२५० लाख मे. टनापर्यंत राहू शकते.

राज्यात मंत्री समितीने ऊसगाळप हंगामाची तारीख निश्चित केल्यानंतर त्या तारखेपासून कारखान्यांची धुराडी पेटणे अपेक्षित आहे. मात्र, साखर आयुक्तालयाकडून ऊसगाळप परवाना न घेताच दरवर्षी ठराविक कारखाने विनापरवाना ऊस गाळप करीत असतात. त्यांच्यावर कागदोपत्री दंडात्मक कारवाई होते. मात्र, अशा विनापरवाना ऊस गाळपप्रकरणी दंड वसूल होत नसल्याचे दिसते. याबाबत बैठकीत चर्चा होणार का? याकडेही लक्ष लागले आहे.

### पुढील दोन आठवडे राज्यात पाऊस

राज्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस राहणार आहे. हवामान विभागाच्या १८ ते २५ सप्टेंबरच्या आठवड्यातील अंदाजानुसार,तळकोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थोडा अधिकचा पाऊस राहणार आहे.तर २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरच्या कालावधीत दक्षिण मध्य महाराष्ट्राचा काही भाग वगळता जोमदार पाऊस आहे.विशेष म्हणजे कोकण किनारपट्टीवर सरासरीच्या अधिकच्या पावसाचा इशारा या कालावधीत देण्यात आला आहे.

**पुढील चार दिवस राज्यात येलो अलर्ट**

शुक्रवारी उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्राचा आणि मराठवाड्याचा काही भाग,उत्तर विदर्भाचा काही भाग, शनिवारी, रविवारी सोलापूर, दक्षिण मराठवाडा मध्ये येलो अलर्ट देण्यात आला आहे.

**पुण्यात पावसाचा मारा**

गुरुवारी दुपारनंत पुण्याला पावसाने पुन्हा झोडपले.दिवस ढगाळ वातावरण आणि दुपारनंतर पावसाची तीव्रता वाढल्याने पुणेकरांची दैना उडाली. सखल भागात पाणी साठले.

### काँग्रेसच्या मतदारांची नावे वगळली

म्हणाले, मुख्य निवडणूक आयुक्त मत चोरांना वाचवण्याचे काम करत आहेत. काही गट आणि जातींना जाणूनबुजून लक्ष्य केले जात आहे. मी विरोधी पक्षनेता आहे आणि मी जे काही बोलतोय ते पूर्ण जबाबदारीने बोलतोय. मी येथे दिलेले पुरावे हे पूर्णपणे खरे आहेत. हा एक प्लॅक अँड व्हाईट पुरावा आहे. माझं माझ्या देशावर खूप प्रेम आहे आणि मी देशाची लोकशाही वाचवण्यासाठी काम करत आहे.

**मतदारांची नावे जाणूनबुजून वगळण्यात आली**

राहुल गांधी यांनी सांगितले की, कर्नाटकातील अलांडमध्ये ६,०१८ मते जाणूनबुजून डिलीट करण्यात आली. ही मते ज्या मतदान केंद्रांवर काँग्रेस उमेदवाराला मतदान होणार होते, त्या मतदान केंद्रांवरून जाणूनबुजून वगळण्यात आली. विशेष म्हणजे ज्यांची नावे वापरून ही मतं डिलीट करण्यात आली, त्यांना याची कल्पना देखील नाही, असे राहुल गांधी म्हणाले. त्यांनी ज्यांच्या नावाचा वापर करून मतं डिलीट करण्यात आली आणि ज्यांची मते डिलीट झाली अशा काही लोकांना देखील समोर आणत वस्तूस्थिती मांडली. तसेच हा सर्व प्रकार निवडणुक आयोगाला माहिती आहे, असा गंभीर आरोप देखील त्यांनी केला.

**मुख्य निवडणूक आयुक्तांनी सीआयडीला उत्तर दिले नाही**

राहुल गांधी यांनी पुढे सांगितले की, कर्नाटकात या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सीआयडीने १८ महिन्यांत १८ पत्रे पाठवली आणि त्यात या फॉर्मचे डेस्टिनेशन आयपी अॅड्रेस, डिव्हाइस डेस्टिनेशन पोर्ट आणि ओटीपी ट्रेल्स देण्यास सांगितले आहे. परंतु निवडणूक आयोग ही माहिती दिली नाही. या माहितीवरून हे ऑपरेशन कुठे केले गेले आणि कोणी केले हे उघड होऊ शकते, असेही ते म्हणाले. निवडणूक आयोगावर हल्लाबोल करताना राहुल गांधी पुढे म्हणाले की, निवडणूक आयोगाने ऑगस्ट २०२३ मध्ये उत्तर दिले, परंतु ही माहिती सीआयडीला दिली नाही. जानेवारी २०२४ मध्ये सीआयडीने पुन्हा निवडणूक आयोगाला संपूर्ण माहिती देण्यासाठी पत्र लिहिले, परंतु त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. १८ स्मरणपत्रे देखील पाठवण्यात आली. कर्नाटकच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणूक आयोगाकडे वारंवार माहिती मागितली, परंतु त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. ज्ञानेश कुमारच हे करत असल्याचा हा ठोस पुरावा आहे. हे मोठ्या प्रमाणात संसाधनांचा वापर करून केले जात आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

**कर्नाटकात ६०१८ नावे वगळण्यात आली**

कर्नाटकातील बनावट मतदानाबद्दल राहुल गांधी यांनी एक मोठा दावा केला. ते म्हणाले, अलंड हा कर्नाटकातील एक विधानसभा मतदारसंघ आहे. कोणीतरी तिथली ६,०१८ मते वगळण्याचा प्रयत्न केला. २०२३ च्या निवडणुकीत वगळण्यात आलेल्या एकूण मतांची संख्या आम्हाला माहिती नाही, परंतु ही संख्या ६०१८ पेक्षा खूपच जास्त होती. परंतु ही ६०१८ मते डिलीट करताना हा प्रकार चुकून उघड झाला.

**सिस्टीम हायजॅक केली आणि मत डिलीट केली**

राहुल गांधी म्हणाले, एका बूथ-लेव्हल अधिकाऱ्याच्या लक्षात आलं की त्यांच्या काकांचे मत डिलीट झाले आहे. त्यांनी त्यांच्या काकांचे मत कोणी डिलीट केले याची चौकशी केली आणि त्यांना कळलं की त्यांच्या शेजाऱ्यानेच ते डिलीट केलं आहे. त्यांनी त्यांच्या शेजाऱ्याला विचारलं तेव्हा त्यांनी सांगितलं की त्यांनी एकही मत डिलीट केलं नाही. याचा अर्थ असा की ज्या व्यक्तीने मत डिलीट केलं आहे किंवा ज्या व्यक्तीचे मत डिलीट झालं आहे, त्यांना याबद्दल काहीही माहिती नव्हती. दुसऱ्याच शक्तीने सिस्टीम हायजॅक केली होती आणि ही मत डिलीट केली होती. तसेच राहुल गांधी म्हणाले की महाराष्ट्र निवडणुकीतही मतदार यादीत मोठ्या संख्येने लोकांची नावे जोडण्यात आली होती.

### शिर्डीत कोंबिंग ऑपरेशन...

राहुल हिरामण गायकवाड(चास, तालुका सिन्नर)यांचा समावेश आहे. त्याबरोबरच ३२ अजामीन पात्र वॉरंटची बजावणी देखील करण्यात आली. त्यात ७ पुरुष ३ महिला यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. त्यात आकाश चंदूसिंग परदेशी (रा. सावळीविहीर), अनिल रघुनाथ कचरे (रा. सावळीविहीर),राजू कैलास वासंडे (सावळीविहीर), विशाल उर्फ राजू कैलास वासंडे (सावळीविहीर),कुमार बाळासाहेब गायकवाड( शिर्डी), अमोल देविदास वाघ (सावळीविहीर) यांचा समावेश आहे तसेच राहाता न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या १२४ समन्सची बजावणी करण्यात आली. त्याबरोबरच दारूबंदी कायद्याअंतर्गत दोन केसेस दाखल करून १८४६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात युवराज भागीरथ गव्हाणे (रा. पिंपळवाड), किसन माधव पटेल (रा. म्हसोबा नगर, शिर्डी), या दोघांवर दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सदरच्या कारवाईत शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, सहाय्य पोलीस निरीक्षक भारत बलैया, अमित वाळके, पोलीस उपनिरीक्षक निवांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक सागर काळे व ३० पोलीस कर्मचाऱ्यांनी या कारवाईत भाग घेतला होता. एकाच दिवशी अवघ्या दहा तासांत प्रथमच शिर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे व त्यांच्या सहकार्याने गुन्हेगारांना पकडण्याची सर्वात मोठी कारवाई करून दाखवल्याने नागरिकांकडून शिर्डी पोलिसांचे कौतुक केले जात आहे.

### नगर, शिर्डी, राहुरी, लोणी...

अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून सुमारे ३२ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मंदिर चोरीच्या गुन्ह्या संदर्भात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस माहिती घेत असताना, भुईकोट किल्ला मैदान भिंगार येथे संशयित येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून संशयितांना पकडण्यात आले. चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण कबाडी, अंमलदार लक्ष्मण खोकले, फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, भिमराज खर्से, रमीजराज आतार, सुनील मालणकर यांच्या पथकाने केली. जप्त केलेला मुद्देमाल व ताब्यातील संशयित आरोपी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

### मेडिकल कौन्सिलमध्ये...

देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्ये विभागाने नकत्याच जारी केलेल्या परिपत्रकानुसार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलला सीसीएमपी कोर्स पास केलेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी करून घेण्यासाठी निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशनचा विरोध आहे. हा निर्णय आरोग्य सेवा व्यवस्थेच्या सुक्षिततेसाठी व गुणवत्तेसाठी गंभीर धोका निर्माण करणारा असल्याचे आयएमएसचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित शासन निर्णय (जीआर) मागे घेतला नाही, तर राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. यानुसार गुरुवारी (दि. १८) रोजी सकाळी ८ ते आज शुक्रवारी (दि. १९) रोजी सकाळी ८ पर्यंतपूर्ण राज्यभर एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्यात आला. या २४ तासासाठी सर्व आरोग्यसेवा (आपत्कालीन सह) बंद ठेवण्यात आल्या. या आंदोलनात नगर शहरातील २०० तर जिल्हाभरातील ३५० हून अधिक हॉस्पिटलमधील १ हजार ५०० डॉक्टर यांनी त्याचे दवाखाने बंद ठेवले.

**एमबीबीए डॉक्टरांचे दावे**

एमबीबीएसचा अभ्यासक्रम ५.५ वर्षांचा असून त्यात १९ विषयांचा परिपूर्ण अभ्यास, अत्यंत सखोल क्लिनिकल अनुभव व एक वर्षाची इंटर्नशिप अनिवार्य आहे. सीसीएमपीचा १ वर्षाचा कोर्स असून, आठवड्यातून २ दिवस शिकवला जातो, ज्यातून आधुनिक वैद्यकीय शास्त्रातील आवश्यक ज्ञान, कौशल्ये व निर्णयक्षमता विकसित होणे शक्य नाही. यामुळे रुग्ण सुरक्षिततेवर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. अपूर्ण प्रशिक्षण असलेल्या व्यक्तींनी रुग्णांना उपचार केल्याने चुकीचे निदान, दुष्परिणाम, अँटीबायोटिक रेसिस्टन्स आणि रुग्ण मृत्यू होण्याची शक्यता वाढते. एमएमसी ही संस्था फक्त पूर्णपणे प्रशिक्षित व पात्र एमबीबीएस डॉक्टरांची नोंदणी करण्यासाठी आहे. सीसीएमपी डॉक्टरांची नोंदणी केल्यास दुहेरी प्रणाली निर्माण होईल व जनतेत संभ्रम, गैरसमज व अविश्वास वाढेल. राष्ट्रीय वैद्यकीय आयोग व राज्य वैद्यकीय परिषदांचे नियम स्पष्ट आहेत: आधुनिक औषधोपचाराचा परवाना फक्त एनएमसी व त्यानंतरच्या पात्रतेसाठी आहे. सीसीएमपी हा एका वर्षाचा कोर्स असून, त्याद्वारे अलोपॅथीचे परवाने देणे कायदेशीरदृष्ट्या अयोग्य असल्याचे ॲलोपॅथी डॉक्टरांचे म्हणणे आहे.